दि. ०७/१०/२०२२

## प्राध्यापक सभा

## Agenda

1) दि. २६/०७/२०२२ च्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे

२) विद्यापीठ स्तरावरील परीक्षा व महाविद्यालयीन पातळीवरील परीक्षा विषयी चर्चा करणे

३) B.A. आणि B.Com च्या अभ्यासक्रमपूर्ततेबाबत विचार विनिमय करणे

४) नॅक मूल्यांकना बाबत चर्चा

### उपस्थित सदस्य

१) प्रा. डॉ. राजेंद्र करनकाळ - प्र. प्राचार्य [signature]
२) प्रा. डॉ. सुनिल पवार - असो. प्रोफे. [signature]
३) प्रा. डॉ. किशोर काजळे - " - [signature]
४) प्रा. सुनिल धाडगे - असि. प्रोफे. [signature]
५) प्रा. कविता चव्हाण - (CHB) [signature]
६) प्रा. कल्पना म्हस्के - (CHB) [signature]
७) Prof. Anjali Singh - (CHB) [signature]
८) प्रा. मनिषा म्यं. गायकवाड - (CHB) [signature]
९) प्रो. सपना चंद्रभूषण दुबे - (CHB) Sapana
१०) Prof. Sahil S. Gaikwad (CHB) [signature]

### चर्चा केलेले मुद्दे व ठराव

१) १८ आक्टो. २०२२ पर्यंत BA / B.Com Ist Sem चे पेपर सेट करून अशोक शिंदे यांच्याकडे द्यावे. तसेच सर्व विद्यार्थिनींचे इंटर्नल पूर्ण करून घेणे त्याचे मार्क्स सुद्धा कार्यालयात जमा करणे.

२) P.F. Statment 31 March 2022 पर्यंतचे कायमस्वरूपी प्राध्यापकांना देणे. या संदर्भात मुख्य लिपिक डोंगरी निर्मळ मोरे यांना सूचना करणे.

3) Bridge Course चा अहवाल 15 oct. 2022 पर्यंत अपलोड करायचा आहे. त्यादृष्टीने सर्व प्राध्यापकांनी आपला अहवाल तयार करून ठेवणे. कॉमर्स विभागाचा अहवाल प्रा. सानिका गायकवाड व प्रा. मनिषा गायकवाड तयार करतील तर आर्ट्स विभागाचा अहवाल प्रा. सुनिल घाडगे व डॉ. किशोर काळे तयार करतील.

4) सर्व प्राध्यापकांचे अभ्यासक्रम जवळपास ७५% पूर्ण झालेले आहेत.

5) Infosis फाउंडेशन चा उपक्रम राबविण्याची जबाबदारी प्रा. सुनिल घाडगे यांच्याकडे राहिल. RBI/BNHS Study Tour organized करणे.

6) विद्यार्थिनी संख्या वाढविण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येकांनी वैयक्तिक स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याकरीता डोंबिवली - कल्याण परिसरातील कनिष्ठ महाविद्यालये व कॉमर्सचे क्लासेस यांना डिसेंबर ते जानेवारी महिन्यात भेटी देणे.

7) नॅक मूल्यांकन करणे अनिवार्य आहे. या दृष्टीने नॅक समन्वयक प्रा. सुनिल घाडगे यांनी योग्य ती पावले उचलून कार्य करावे. याकरीता महाविद्यालयाची वेबसाईट तयार करण्याची गरज आहे. जी नॅकला अपेक्षित असते तशीच वेबसाईट तयार करणे. या संदर्भात CDC मिटींग घेऊन संस्थेला नॅकची गरज स्पष्ट करून देणे.

प्राध्यापक व प्राध्यापकेतर सभा दि. 20/10/2022

## Agenda

1) दि. 06/10/2022 च्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे

2) प्रथम सत्रातील अभ्यासक्रम पूर्ततेचा आढावा घेणे

3) B.A-I व B.Com-I चे पेपर जमा करणे

4) नॅक विषयी चर्चा करणे

5) नॅकसाठी लागणाऱ्या खर्चाचा तपशील सादर करणे

6) नॅक संबंधित माहितीचे वाचन करण्याविषयी सूचना

7) दि. 21/10/2022 रोजी 2.30 वा. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत नियोजित मिटींगला ~~उपस्थित~~ सर्वांनी उपस्थित राहणे अनिवार्य

8) बजेट तयार करण्याबाबत (2022-2023)

9) प्राध्यापकेतर वर्गाच्या कामाचे स्वरूप व जबाबदारी

उपस्थित सदस्य

1) प्रा. डॉ. राजेंद्र कुरनकाळ - प्र. प्राचार्य
2) प्रा. डॉ. सुनील पवार
3) प्रा. डॉ. किशोर कासळे
4) प्रा. सुनील घाडगे
5) प्रा. कल्पना म्हस्के (C.H.B)
6) प्रा. संकेत गजरे (ग्रंथपाल)
7) Prof. Sahil. Gaikwad (C.H.B)
8) Wagh Dinkar Ramdas (Reen)
9) बागुल विजय धर्मा (शिपाई)
10) रघुनाथ गणू गायकवाड (शिपाई)

११) श्री विलासराव पंडुरंग भगत (शिपाई)

१२) मोरे निर्मला (Head Clerk) 19/10/2022

13) Anjali B. Singh (Asst. Prof) (C.H.B)

१४) प्रो. मनिषा म्हें. गायकवाड (C.H.B)

१५) प्रा. कल्पना म्हस्के (CHB)

16) सपना चंद्रभूषण दुबे (CHB) Sapana

17) Kavita Chavan (CHB)

खालील मुद्यावर चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर केले.

२) पहिल्या सत्राचा अभ्यासक्रम सर्व विषयाच्या प्राध्यापकांनी पूर्ण केला की नाही याचा आढावा घेण्यात आली. परिक्षेच्या दृष्टिकोणातून अधिक सराव करण्यासाठी online सुध्या लेक्चर घेण्याचा निर्णय करण्यात आला.

४) कॉलेज पहिल्या वर्षाच्या परिक्षेचे पेपर सर्व प्राध्यापकांनी तयार करून कार्यालयात जमा करणे. त्या संदर्भात सूचना आल्यानंतर कार्यालयाच्या Email वर पाठविणे.

६) दि. २१ ऑक्टो. २०२२ रोजी दुपारी 2 वा. CDC मिटींग मध्ये सर्वांनी उपस्थित राहण्याविषयी सूचना देण्यात आली.

७) NAAC समन्वयक प्रा. डाडगे यांनी संस्थेसोबत होणाऱ्या २१ ऑक्टो. २०२२ च्या सभेमध्ये NAAC साठी लागणारा खर्च व प्रक्रिया छापील स्वरूपात सादर करावी.

८) NAAC साठी सर्व नियमित व CHB प्राध्यापकांनी काम करण्यासाठी उत्सुक राहावे.

९) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप याविषयी चर्चा करण्यात आली.

१०) UG आणि PG विभागाचा स्वतंत्र बजेट मुख्य लिपिक श्रीमती निर्मला मोरे यांनी २१ ऑक्टो. २०२२ च्या सादर करण्यासाठी तयार करावा.

११) प्राचार्य व अन्य रिक्त जागा भरण्या संदर्भात संस्थेसोबत चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

Scanned By Camera Scanner

# प्राध्यापक सभा - दि. १२ नोव्हे. २०२२

महाविद्यालयातील विविध प्रशासकीय समिती व NAAC या संदर्भात सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची संयुक्त सभा आयोजित केली. त्यामध्ये खालील कर्मचारी उपस्थित होते.

१) प्रा. डॉ. राजेंद्र करनकाळ - प्र. प्राचार्य -
२) प्रा. डॉ. सुनिल पवार - असो. प्रोफे. -
३) प्रा. डॉ. किशोर काळे - असो. प्रोफे. -
४) प्रा. सपना दुबे - CHB Sapana
5) प्रो. मनिषा गायकवाड (CHB) -
6) Prof. Anjali Singh (CHB)
7) रघुनाथ गणु गायकवाड (Peon)
8) बागुल विजय [redacted] शर्मा (Peon)
9) मोरे निर्मला दt (Clerk) NMore
10) Ashok A. Shinde (Clerk)

खालील मुद्यावर चर्चा झाली व ठराव पास करण्यात आले.

१) दि. ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी मुंबई विद्यापीठ आयोजित राज्यस्तरीय NAAC परिषदेला महाविद्यालयातील सर्वांनी आभासी पद्धतीने उपस्थित राहून NAAC ची गंभीरता समजून घेतली. त्याबद्दल प्र. प्राचार्य डॉ. राजेंद्र करनकाळ यांनी सर्वांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले. त्यानुसार आपल्या महाविद्यालयाचे NAAC करण्याचे कार्य तातडीने व्हावे अशी आशा व्यक्त केली.

२) IQAC Coordinator म्हणून प्रा. सुनिल घाडगे तर NAAC Coordinator म्हणून डॉ. किशोर काजळे यांनी कामकाज पहावे अशी ईच्छा प्रभारी प्राचार्यांनी व्यक्त केली.

३) NAAC मूल्यांकनाचे सात निकष प्राध्यापकामध्ये वितरीत करून त्यानुसार जलद गतीने कागदपत्रे व माहिती संकलीत करण्याचा ठराव पास करण्यात आला.

४) NAAC मूल्यांकनाची अद्यायावत माहिती व्हावी याकरीता वज्रेश्वरी, बिरला कॉलेज व ठाणे येथील महाविद्यालयाचे IQAC समन्वयक यांना विशेष व्याख्यानासाठी आमंत्रित करण्याचा ठराव पास करण्यात आला.

5) NAAC मूल्यांकनासाठी महाविद्यालयाची website तातडीने तयार करून घ्यावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

Scanned By Camera Scanner

६) NAAC मूल्यांकनासाठी ग्रंथालय सॉफ्टवेअर खरेदी करण्याचा ठराव पास करण्यात आला.

७) NAAC साठी प्रारंभिक खर्चाची तरतूद होणेबाबत IQAC समन्वयक प्रा. सुनिल घाडगे यांनी मांडली. त्यामध्ये
* Website खर्च = 75 हजार रुपये
* ग्रंथालय सॉफवेअर खर्च = 30 हजार रुपये + 18% GST
* दोन नविन संगणक खर्च = 60 हजार रुपये
* स्टेशनरी खर्च - 50 हजार रुपये

या व्यतिरिक्त तपशिलवार खर्च कार्यालय व संस्थेला सादर केला जाईल असे प्रा. घाडगे यांनी सांगितले.

८) F.Y.B.A. व F.Y.B.Com. प्रथम सत्र परिक्षेसाठी प्रश्नपत्रिका तयार करून देणे व Internal marks कार्यालयात त्वरीत सादर करण्याचा ठराव पास करण्यात आला.

९) महाविद्यालयातील स्पोर्ट विभाग कार्यान्वित करून त्याचे प्रमुख म्हणून संकल्प गणेश (ग्रंथपाल) व सहाय्यक म्हणून वाणिज्य विभागातील एका महिला प्राध्यापिकेची निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१०) डिसेंबर २०२२ मध्ये विद्यापीठाच्या परीक्षा असल्यामुळे महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व स्पोर्ट हे उपक्रम जानेवारी 2023 मध्ये घेण्याचा ठराव करण्यात आला.

११) महाविद्यालयातील सर्व मंडळाच्या स्पर्धांचे बक्षिस वितरण मार्च 2023 मध्ये घेण्याचे ठरविण्यात आले.

१२) 'कमवा आणि शिका' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील एम.ए. इतिहास विषयाची विद्यार्थिनी कु. ज्योति [illegible] गुप्ता हिची निवड करून तिला कार्यालयीन सहाय्यक म्हणून काम देण्यात आले.

१३) माजी विद्यार्थी संघ याचे समन्वयक म्हणून डॉ. सुनिल पवार यांची निवड करण्यात व सहाय्यक म्हणून अशोक शिंदे यांची निवड करण्यात आली.

१४) महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे रेस्टर अद्ययावत तत्परतेने करण्याचा ठराव पास करून सदर कामकाज वरिष्ठ लिपिक श्रीमती निर्मला मोरे यांनी गंभीरतेने करावे असे ठरविण्यात आले.

Scanned By Camera Scanner

# प्राध्यापक सभा - दि. २५ नोव्हेंबर, २०२२

उपस्थित प्राध्यापक वर्ग व कर्मचारी

१) प्रा. डॉ. राजेंद्र करनकाळ - प्र. प्राचार्य - [signature]
२) प्रा. डॉ. सुनिल पवार - असो. प्रोफे. - [signature]
३) प्रा. डॉ. किशोर वाजळे - असो. प्रोफे - [signature]
४) प्रा. सुनिल घाडगे - असि. प्रोफे. (IQAC समन्वयक) - [signature]
५) प्रा. संकल्प गजबे - ग्रंथपाल - [signature]
६) प्रा. मनिषा गायकवाड - असि. प्रोफे. (CHB) - [signature]
७) प्रा. कल्पना म्हस्के - असि. प्रोफे. (CHB) - [signature]
८) प्रा. साहिल गायकवाड - असि. प्रोफे. (CHB) - [signature]
९) अशोक शिंदे - Clerk -
१०) प्रा. सपना दुबे - असि. प्रोफे. (CHB) - Sapana

## अजेंडा

1) नॅक मूल्यांकन
२) सात निकष चर्चा व वितरण

## खालीलप्रमाणे चर्चा व ठराव करण्यात आले.

१) IQAC समन्वयक प्रा. सुनील घाडगे यांनी आजच्या सभेची प्रस्तावना मांडली. त्यामध्ये शून्यापासून आपल्याला नॅक मूल्यांकन कामाची सुरूवात करायची असून त्यासाठी सर्वप्रथम महाविद्यालयाची Website निर्माण करणे अनिवार्य आहे.

२) महाविद्यालयाचे AQAR Report 2009 पर्यंत नॅक च्या वेबसाईटवर अपलोड केले आहेत. 2009 नंतर AQAR Report अपलोड केले नाही, ही माहिती प्रा. घाडगे यांनी दिली.

३) कला आणि वाणिज्य विभागातील पाच पूर्णवेळ नियमित प्राध्यापक सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या कालखंडातील महाविद्यालयातील त्यांनी राबविलेल्या उपक्रमाची माहिती त्यांच्याकडून घेण्याचा प्रयत्न करूया, असा विचार मांडण्यात आला.

४) 2016-17 हे नॅक मूल्यांकनासाठी प्रारंभिक शैक्षणिक सत्र समजून 2022-23 हे शैक्षणिक सत्र अंतिम गृहित धरून कागदपत्रे जमा करावीत. महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन या कालखंडातील करायचे असल्यामुळे 2016-17 ते 2022-23 या सर्व शैक्षणिक सत्रातील सर्वप्रकारची माहिती नॅक निकषानुसार जमा करावी असे सूचविण्यात आले.

५) AQAR हा वार्षिक अहवाल प्रत्येक वर्षाचा अपलोड करून त्यानुसार पाच वर्षाचा SSR Report तयार करावा लागेल, अशी माहिती दिली.

Scanned By Camera Scanner

६) AQAR Report मध्ये Department Profile, Professor Achievement, Extra curricular Activities, Various Committee अशा घटकांचा समावेश राहील.

७) इतिहास, मराठी, अर्थशास्त्र, वाणिज्य व ग्रंथालय या आपल्या महाविद्यालयातील पाच विभागाने विषयानुरूप प्रमाणपत्र कोर्सेस सुरु करावेत. जसे, मराठी शुद्धलेखन, इतिहासाची साधने, Data Entry,

८) बिरला कॉलेज, कल्याण हे आपल्या कॉलेजचे Mentor असून तेथील प्रा. नारायणे सर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. मात्र त्यापूर्वी आपल्या कॉलेजच्या CDC समितीचे सदस्य डॉ. विनय भोळे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करावे अशी सूचना प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र करनकाळ यांनी मांडली.

९) समन्वयक प्रा. घाडगे यांनी सात निकषांपैकी आजच्या सभेत दोन निकष व त्यामधील उपप्रश्नांची चर्चा केली.

१०) नविन नियमांना अनुसरून ज्या महाविद्यालयाचे नॅक झाले. अशा महाविद्यालयांना भेट देतांना आपल्या संस्थेच्या संचालकांना सोबत न्यावे अशी सूचना मांडण्यात आली.

११) नॅक झालेल्या कॉलेजच्या वेबसाईट वरील त्यांची माहिती बघून आपले निकष व AQAR ची माहिती पूर्ण करता येतील.

# प्राध्यापक सभा - दि. १४ डिसे. २०२२

१) प्रा. डॉ. राजेंद्र करनकाळ - प्र. प्राचार्य -
२) प्रा. डॉ. सुनिल पवार - असो. प्रोफेसर -
३) प्रा. डॉ. किशोर काजळे - असो. प्रोफेसर -
४) प्रा. सुनील घाडगे - असि. प्रोफेसर -
५) प्रा. कल्पना म्हस्के - CHB Professor -
६) प्रा. अंजली सिंग - CHB Professor -
७) प्रा. साहिल गायकवाड - CHB Professor -
८) संकल्प गजभिये - ग्रंथपाल
9) प्रो सपना दुबे - (CHB (प्रो)) Sapna

## खालील मुद्दे - चर्चा व ठराव

१) मागील सभेचे इतिवृत्त प्र. प्राचार्य यांनी वाचून दाखविले.

२) २४ डिसे. पूर्वी मेरर प्रा. नारायणे, बिरळा कॉलेज यांचे व्याख्यान आयोजित करण्याचा ठराव पास करण्यात आला. सदर व्याख्यानाची माहिती सहसंचालक कार्यालय व SNDT विद्यापीठ यांना सुद्धा पाठविण्यात यावी असे ठरविण्यात आले.

३) नॅक झालेल्या कॉलेजला भेट देण्यासंदर्भात तारीख निश्चित करून संस्थेच्या संचालकांना सोबत घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

४) महाविद्यालयाची वेबसाईट तयार करण्या संदर्भात White Board या कंपनीचे Online व्याख्यान शनिवार, 17 डिसे. २०२२ रोजी आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर कोर्ससाठी इतर महाविद्यालयांना सहभागी करून घेण्याचा ठराव करण्यात आला.

५) मराठी व इतिहास विभागाने नॅक मूल्यांकन अनुषंगाने कोर्सेस सुरु करावेत अशी सूचना करण्यात आली. त्यामध्ये मराठी विभागाने 'शुद्धलेखन कोर्स' व इतिहास विभागाद्वारे 'ब्राह्मी लिपी' किंवा 'इतिहासाची साधने' यापैकी एक कोर्स घेण्याचे ठरविण्यात आले.

६) पी. एन दोशी कॉलेज घाटकोपर किंवा MMP शाह कॉलेज माटुंगा या SNDT विद्यापीठाच्या कॉलेजचे नॅक मूल्यांकन झाल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष भेट देण्याचा ठराव करण्यात आला. सदर भेट 22 किंवा 23 डिसे. २०२२ रोजी आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासंदर्भातील आयोजन व पत्रव्यवहार IQAC समन्वयकांनी करण्याचे ठरले.

Scanned By Camera Scanner

८) प्रा. घाडगे यांनी NAAC मधील पहिल्या निकषातील आवश्यक माहितीची चर्चा केली.

९) Teaching Plan प्रत्येक प्राध्यापकाने 2022-23 या सत्राचा तयार करण्यात यावा. तो नेमका कसा असावा याचा नमूना प्रा. घाडगे यांनी त्यांच्या विषयाचा तयार करून सर्वांना दाखवावा असे ठरविण्यात आले.

९) Internal परीक्षेचा तपशील प्रत्येक प्राध्यापकाने तयार करण्याचे ठरविण्यात आले.

१०) वाणिज्य विभागाने Social media, Tally, Share market असे कोर्सेस सुरु करु शकतात अशी सूचना करण्यात आली.

११) Feedback कसा तयार करायचा याबद्दल नारायणे सरांना विचारणा करावी असे ठरविण्यात आले.

१२) 2021 पूर्वीचे Feedback form तयार करण्यासाठी सर्वांनी एकत्र येवून एक सभा घेण्याचे ठरले.

१३) प्रा. डॉ. किशोर काजळे यांनी criteria-II मधील आवश्यक माहिती व तयारी सर्वांसमोर मांडली.

१४) प्रा. कल्पना म्हस्के यांनी criteria-VI चे वाचन केले आणि अडचणी मांडल्या.

१५) प्रा. डॉ. सुनिल पवार यांनी criteria-III बाबत समस्या मांडल्या.

१६) प्रा. डॉ. पवार यांनी NSS सुरु करण्याचा विषय मांडला. त्यानुसार प्रभारी प्राचार्यांनी विद्यापीठाला विचारणा करून निर्णय घेण्याची सूचना मांडली.

Scanned By Camera Scanner

दि. ६ फेब्रुवारी २०२३

# प्राध्यापक व प्राध्यापकेतर वर्ग सभा

## उपस्थिती

१) प्रा. डॉ. राजेंद्र कुरनकाळ - प्र. प्राचार्य
२) प्रा. डॉ. सुनील पवार - असो. प्रोफेसर
३) प्रा. डॉ. किशोर कोल्हे - असो. प्रोफेसर
४) प्रा. सुनील घोडके - असि. प्रोफेसर
५) श्री. संकल्प गजबे - ग्रंथपाल
६) प्रा. कल्पना म्हस्के - असि. प्रोफेसर (C.H.B.)
७) प्रा. साहिल गायकवाड - असि. प्रोफेसर (C.H.B.)
८) श्री. अशोक शिंदे - वरिष्ठ लिपिक
९) श्री. दिनकर वाघ - शिपाई
१०) श्री. विक्रम बागुल - शिपाई

## खालील मुद्दयांवर चर्चा करण्यात आली.

1) दि. 2 फेब्रुवारी 2023 रोजी ब्लॉसम इंटरनॅशनल स्कुल डोंबिवली येथील कै. गो. ना. अकोलकर सभागृहात महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन यशस्वी पार पडल्याबाबत सर्व स्टाफचे प्र. प्राचार्य यांनी आभार मानले. तसेच सगळ्यांनी teamwork करून सहकार्य केल्याबद्दल आभार मानले.

२) प्रमुख पाहुणे सौ. अदिती चौधरी मॅडम यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस द्यायला पाहिजे होते. त्याच्या विसर पडल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात आली.

3) मॅनेजिंग सेक्रेटरी संकल्प गजबे, प्रा. साहिल गायकवाड व श्री. अशोक शिंदे यांनी तेनपैकी परिश्रम घेऊन PPT तयार केले. या बाबत सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

४) श्री. दिनकर वाघ यांनी उत्तमप्रकारे PPT व सांस्कृतिक कार्यक्रमाचे Event सुसंबद्ध पद्धतीने केल्याने सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण व LCD वरील दृश्य व्यवस्थित होते.

५) प्राध्यापक व प्राध्यापकेतर वर्गांनी दि. ९/२/2023 पर्यंत web site साठी वैयक्तिक व संबंधी माहिती द्यावी असे ठरले.

६) २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील स्नेहसंमेलन फक्त ५०००/ (पाच हजार रु.) मध्ये खर्चात पूर्ण झाले.

७) संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास कोल्हटकर उपाध्यक्ष प्रदीप गोसावी, प्रमुख पाहुणे सौ. अदिती चौधरी संचालक सदस्य श्री विकास पुराणिक, श्री. संजय कुळकर्णी श्री गजानन बामूल, अध्यक्ष ग्रा. शि. सं. चे मा. राजाराम पाटील, परीक्षक स्मिता गोसावी, मा. पुनम पाटील या सर्वांचे महाविद्यालयातर्फे आभार मानण्यात आले.

८) website साठी लागणारा खर्च महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी ठरल्याप्रमाणे पगार झाल्यावर घेऊन जमा करावेत.

९) Income tax संदर्भातील कागदपत्रे सोरे मॅडम यांच्याकडे जमा करावे

१०) NAAC ची फेज व त्यासंबंधीच्या आढावा यासाठी दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी १२.३० वा. मिटींग आयोजित करण्याचे ठरले.

११) ~~बाली आदिवासी भारतीय मराठी साहित्य.~~

११) Placement Cell संबंधी कार्यक्रम दि. ११/२/2023 रोजी स. कॉमर्स ८.३० ते १२.३० वा. आर्ट्स साठी 12.30 ते ३.०० वा. होणार आहे

१२) उत्राणे येथे लेक्चर घेण्यासाठी प्राध्यापकांनी जावे व कॉलेजमधील लेक्चरही घेणे.

१३) अॅडमिशनसाठी प्राध्यापकांनी ज्युनियर कॉलेज मध्ये जाणे त्याचे नियोजन करावे.

१४) सर्वांचे अभिनंदन व आभार मानून सभा समाप्त झाली

# Staff Meeting - 14/05/2023

## उपस्थित प्राध्यापक व कर्मचारी

१) डॉ. राजेंद्र करनकाळ - प्र. प्राचार्य - [signature]
२) डॉ. सुनिल पवार - प्रोफेसर - [signature]
३) डॉ. किशोर काजळे - असो. प्रोफेसर - [signature]
४) डॉ. सुनिल घाडगे - असि. प्रोफेसर - [signature]
५) संकल्प गजबे - ग्रंथपाल - [signature]
६) श्रीमती निर्मला मोरे - मुख्य लिपिक - [signature]
७) अशोक शिंदे - वरिष्ठ लिपिक - [signature]
८) रघुनाथ गायकवाड - शिपाई - [signature]

★ खालील विषयावर चर्चा करण्यात येऊन ठराव पास करण्यात आले

१) महाविद्यालयाचे NAAC व website याबद्दल चर्चा करण्यात आली.

२) महाविद्यालयाची website निर्माण करण्यासाठी कामाची विभागणी केली होती. त्यानुसार डॉ. किशोर काजळे, संकल्प गजबे व अशोक शिंदे यांनी काम पूर्ण केले. मात्र डॉ. सुनिल पवार व डॉ. सुनिल घाडगे यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे website चे काम खंडीत झाले.

३) website निर्माण करण्यासाठी जो खर्च येईल तो सर्व खर्च कर्मचारी व प्राध्यापक यांनी डोनेशन देण्याचे ठरविले होते. त्यानुसार डॉ. राजेंद्र करनकाळ, डॉ. किशोर काजळे, संकल्प गजबे, अशोक शिंदे, निर्मला मोरे, रघुनाथ गायकवाड, विलास भगत, विजय बागूल यांनी आपला आर्थिक वाटा महाविद्यालयाला चेक द्वारे दिला. मात्र डॉ. सुनिल पवार, डॉ. सुनिल घाडगे व दिनकर वाघ यांनी आर्थिक देणगी दिली नाही.

४) महाविद्यालयाची website स्थापन करण्यावर सर्वांनी आपले लक्ष केंद्रीत करावे आणि त्यानंतर NAAC प्रोसेस पूर्ण करण्यासाठी सर्वांनी परिश्रम घ्यावे असे ठरविण्यात आले.

५) 12 वी चा निकाल लागण्यापूर्वी सर्वांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या प्रवेशासाठी कार्य करावे. त्यासाठी पॅम्पलेट व पत्र आजूबाजूच्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना भेट द्यावी. असे ठरविण्यात आले.

६) HSC चा निकाल लागण्यापूर्वी सर्वांनी आजूबाजूच्या परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेशासाठी प्रयत्न करावेत. किमान 12 वीच्या निकालापूर्वी दोन ते तीन दिवस आधी सर्वांनी भेटी द्यावी.